शाश्वत विकास उदिष्टे, राजकीय संस्था आणि आदिवासी समाज

डॉ. व्ही. एस. इंगळे
मार्गदर्शक, प्रोफेसर व राज्यशास्त्र विभाग प्रमुख, गो. सी. गावंडे महाविद्यालय, उमरखेड

प्रदिप अंकुश इंगळे
संशोधक विद्यार्थी, गो. सी. गावंडे महाविद्यालय, उमरखेड

सारांश
विकास हि प्रत्येक समाजाची गरज आहे. मात्र विकासाचा अर्थ केवळ इमारती, रस्त्ये, उद्योग-धंदे आणि उत्पन्न वाढवणे एवढेच नाही तर समाजातील प्रत्येक व्यक्तीला चांगले शिक्षण, सुरक्षित जीवन, आरोग्य आणि समान संधी मिळणे होऊ तसेच नैसर्गिक साधन संमापत्तीचे रक्षण होणे आवश्यक आहे. आज विकास करतान पुढील पिढ्यांचा विचार करणे गरजेचे आहे. या विचारातून श्वाश्वत विकास संकल्पना पुढे आली आहे. संयुक्त राष्ट्रांनी २०१५ मध्ये स्वीकारलेली 'श्वाश्वत विकास उद्दिष्ट्ये' हि निसर्गकेंद्री व मानवकेंद्री विकासाचा समतोल साधण्याचा प्रयत्न करतात. वर्षानुवर्षे जल, जंगल आणि जमिनीशी एकरूप होवून जगणारा आदिवासी समाज हा निसर्गतः शाश्वत जीवनशैलीचा खरा वाहक आहे. मात्र आधुनिक राजकीय संस्था, लोकशाही प्रक्रिया आणि विकास धोरणे राबवताना आदिवासी समाजाचे अस्तित्व, हक्क आणि राजकीय सहभाग कितपत सुरक्षित राहिला आहे. हा महत्वाचा प्रश्न आहे. संयुक्त राष्ट्र संघाने २०१५ ते २०३० विकास उद्दिष्टे निश्चीत केली आहेत. भूक आणि कुपोषण दूर करणे, आरोग्य आणि शिक्षण सुधारणे, आणि कुपोषण दूर करणे, आरोग्य आणि शिक्षण सुधारणे, गरिबी कमी करणे, रोजगार निर्माण करणे, सामाजिक विषमता दूर करणे आणि शांतापूर्ण समाज आशी उद्दिष्टांची व्यापक दिशा आहे.

की-वर्ड्स:- *शाश्वत विकास, शाश्वत विकास उद्दिष्टे, राजकीय संस्था, आदिवासी समाज, राजकीय सहभाग, सामाजिक न्याय.*

- **प्रस्तावना**

मानवी समाजाचा विकास हा सतत बदत राहणार प्रवास आहे. पूर्वी विकासाचा विचार करताना मुख्यतः रोजगार, आर्थिक वाढ, आणि उत्पादन वाढ यांना महत्त्व जात होते. परंतु जसा काळ बदलत गेला तसे विकासाच्या या दृष्टिकोनातील काही मर्यादा स्पष्ट झाल्या. आर्थिक प्रगती झाली तरी समाजातील सर्व लोकांच्या जीवनात समान सुधारणा होताना दिसत नाही, हे अनेक ठिकाणी दिसून आले. एका बाजूला उद्योग धंदे, तंत्रज्ञान आणि शहरीकरण वाढत असताना दुसऱ्या बाजूला गरिबी, बेरोजगारी, सामाजिक विषमता, जंगलतोड, पाण्याची कमतरता आणि पर्यावरणाचा ऱ्हास यांसारख्या समस्या वाढल्या. त्यामुळे विकास कसा असावा, याचा नव्याने विचार करण्याची गरज निर्माण झाली. विकासामुळे आजच्या पिढीच्या गरजा पूर्ण झाल्या पाहिजेत; पण त्यासाठी भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर अन्याय होऊ नये. विकासाच्या प्रक्रियेत पर्यावरणाचा समतोल, सामाजिक न्याय आणि आर्थिक प्रगती यांचा विचार झाला पाहिजे. यालाच व्यापक अर्थाने शाश्वत विकास असे म्हणता येते.

- **शाश्वत विकास म्हणजे काय?**

भविष्यातील पिढ्यांच्या गरजांना धक्का न लावता वर्तमान काळातील गरजा पूर्ण करणे होय. १९८७ मधील ब्रुंडलंड अहवालात (Our Common Future) श्वाश्वत विकासाची हि प्रथम व्याख्या मांडण्यात आली.

- **श्वाश्वत विकासाचे तीन प्रमुख स्तंभ :-**
- **आर्थिक स्तंभ :-** हा स्तंभ आर्थिक वाढ अशा प्रकारे सध्य करण्यावर भर देतो, ज्यामुळे पर्यावरण आणि समाजाचे नुकसान होणार नाही. समाजातील सर्व घटकांना सोबत घेवून दीर्घकाळ टिकून राहील.

हरित रोजगार- असे रोजगार किंवा नोकऱ्या ज्या पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी व त्याचे संवर्धन करण्यासाठी आणि निसर्गाचा समतोल राखण्यासाठी मदत करतात.

सर्वसमावेशक विकास- म्हणजे असा आर्थिक व सामाजिक विकास, ज्याचा लाभ समाजातील प्रत्येक घटकाला, विशेषतः गरीब, वंचितांना आणि शेवटच्या घटकापर्यंत समान रूपाने मिळतो. हे केवळ जीडीपी (GDP) वाढवण्यापुरता मर्यादित नसून संधीची समानता आणि न्याय्य वाटपाची प्रक्रिया आहे.

शाश्वत तंत्रज्ञान- एक असा दृष्टिकोन आहे जो पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी, नैसर्गिक संसाधनांची बचत करण्यासाठी आणि भावी पिढ्यांचे जीवन सुरक्षित करण्यासाठी विकसित केला गेला आहे.

चक्रीय अर्थव्यवस्था– म्हणजे उत्पादन, वापर आणि विल्हेवाट या पारंपरिक साखळीला बदलून संसाधनांचा पुनर्वापर करणारी आणि कचरा शून्य पातळीवर आणणारी एक शाश्वत आर्थिक व्यवस्था.

दीर्घकालीन वाढ– नैसर्गिक संसाधनांचा अतिवापर न करता अशी अर्थव्यवस्था निर्माण करणे जि भविष्यातही स्थिर राहील.

• **सामाजिक स्तंभ:–** हा स्तंब मानवी कल्याण, समानता आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाचा दर्जा सुधारण्यावर लक्ष्य केंद्रित करतो.

गरिबी आणि भूख निर्मुलन– समाजातील शेवटच्या घटकापर्यंत अन्न, वस्त्र आणि निवारा या मुलभूत गरजा पोहचवणे.

गुणवत्तापूर्ण शिक्षण– जात, धर्म किंवा लिंग असा कोणताही भेदभाव न करता सर्वांना दर्जेदार आणि परवडणारे शिक्षण उपलब्ध करून देणे.

आरोग्य आणि कल्याण– सर्वांसाठी उत्तम वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणे आणि मानवी आरोग्याचे रक्षण करणे.

लैंगिक समानता– महिला आणि पुरुषांना समान हक्क, वेतन आणि संधी देणे. महिला साब्लीकारनाला चालना देणे.

समान आणि सामाजिक न्याय– श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी कमी करणे. उपेक्षित व वंचित घटकांना (उदा. आदिवासी, अपंग, अल्पसंख्यांक) विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे.

सुरक्षित आणि शाश्वत शहरे– लोकांना राहण्यासाठी सुरक्षित, स्वच्छ आणि पायाभूत सुविधांनी सज्ज अशी शहरे आणि गावे निर्माण करणे.

मानवी हक्क आणि कामगार कल्याण– कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण, बलमजुरीला आळा आणि कामगारांना योग्य मोबदला मिळून देणे.

• **पर्यावरणीय स्तंभ :–** हा स्तंभ मानवी अस्तित्वाचा सर्वात महत्वाचा पाया आहे. आपले जीवन, अन्न, हवा आणि पाणी हे संपूर्णपणेनिसर्गावर अवलंबून आहे. त्यामुळे आर्थिक आणि सामाजिक प्रगती करताना नैसर्गिक संसाधानाचे रक्षण करणे आणि पृथ्वीचे संतुलन राखणे हा या स्तंभाचा मुख्य उद्देश आहे.

नैसर्गिक संसाधनाचे जतन– जल, जंगल, जमीन आणि खनिजे यांसारख्या साधनाचावापर काळजीपूर्वक करणे, जेनेकरून भविष्यातील पिढ्यांना तुटवडा भासणार नाही.

हवामान बदलाचा सामना– कार्बनचे उत्सर्जन कमी करणे आणि जागतिक तापमानवाढ रोखण्यासाठी प्रयत्न करणे.

नुतनिकर्णीय उर्जेचा वापर– कोळसा आणि डीजेल यांसारख्या प्रदूषणकारी इंधनासौर ऐवजी उर्जा, पवन उर्जा आणि जलविद्युत उर्जा यांचा वापर करणे.

जैवविविधतेचे रक्षण– जंगलाचे संवर्धन करणे आणि नामशेष होत चाललेल्या प्राणी व वनस्पतींच्या प्रजातींचे रक्षण करणे.

कचरा व्यवस्थापन– प्लास्टीकचा वापर कमी करणे, पुनर्वापर करणे आणि घातक कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावून प्रदूषण रोखणे.

स्वच्छ हवा आणि पाणी– नद्या, समुद्र आणि हवेचे प्रदूषण रोखणे, जेणेकरून सर्व सजीवांना शुध्द पर्यावरण मिळेल.

• **शाश्वत विकास उद्दिष्टे आणि आदिवासी समाज :–**

संयुक्त राष्ट्र संघाने निश्चित केलेली 17 उद्दिष्टे समाजातील सर्व घटकांसाठी आहेत. मात्र त्यातील अनेक उद्दिष्टांचा आदिवासी समाजाशी थेट संबंध येतो.

गरिबी निर्मूलनाचे उद्दिष्ट आदिवासी समाजाच्या आर्थिक परिस्थितीशी संबंधित आहे. दुर्गम आणि ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी कमी असल्यामुळे आदिवासी कुटुंबांना अनेकदा पारंपरिक उपजीविकेवर अवलंबून राहावे लागते. गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे उद्दिष्टही आदिवासी समाजासाठी महत्त्वाचे आहे. शिक्षणामुळे केवळ रोजगाराच्या संधी वाढत नाहीत, तर सामाजिक आणि राजकीय जागरूकताही वाढते. आरोग्याच्या बाबतीतही आदिवासी भागात विशेष परिस्थिती आहे. दुर्गम वस्ती, आरोग्य केंद्रांपासूनचे अंतर आणि आरोग्य सुविधांची मर्यादित उपलब्धता यामुळे काही ठिकाणी आरोग्यसेवांपर्यंत पोहोचणे कठीण होते. याचप्रमाणे जंगल, जैवविविधता आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण हे आदिवासी समाजाच्या जीवनाशी जवळून संबंधित आहे.

- **राजकीय संस्था आणि शाश्वत विकास :-**

शाश्वत विकासाची उद्दिष्टे निश्चित करणे हा पहिला टप्पा आहे; परंतु ती प्रत्यक्षात आणण्यासाठी सक्षम राजकीय संस्था आवश्यक असतात. संसद आणि राज्य विधानमंडळे कायदे करतात, विकासाच्या प्रश्नांवर चर्चा करतात आणि सरकारच्या कामकाजावर नियंत्रण ठेवतात. सरकार आणि प्रशासन विविध विकास योजना तयार करून त्यांची अंमलबजावणी करतात. न्यायपालिका नागरिकांच्या अधिकारांचे संरक्षण करण्याचे काम करते. स्थानिक स्वराज्य संस्था मात्र सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट जोडलेल्या आहेत. म्हणून शाश्वत विकासाचा विचार करताना राजकीय संस्थांकडे केवळ शासन करणाऱ्या संस्था म्हणून न पाहता विकासाला दिशा देणाऱ्या आणि नागरिकांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेणाऱ्या संस्था म्हणून पाहणे आवश्यक आहे

•आदिवासी समाज आणि नैसर्गिक संसाधने :-

आदिवासी समाजाचे जीवन जंगल, जमीन, पाणी आणि इतर नैसर्गिक संसाधनांशी जोडलेले आहे. जंगलातून मिळणारे विविध वनोपज, शेती, पशुपालन आणि इतर पारंपरिक उपजीविका त्यांच्या जीवनाचा भाग आहेत. त्यामुळे विकास करताना नैसर्गिक संसाधनांचा वापर आणि त्यांचे संरक्षण यामध्ये संतुलन असणे गरजेचे आहे. जर विकासाच्या नावाखाली जंगलाचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास झाला किंवा स्थानिक लोकांच्या उपजीविकेवर परिणाम झाला, तर त्याचा थेट परिणाम आदिवासी कुटुंबांवर होतो. म्हणून आदिवासी भागातील विकासाचे नियोजन करताना स्थानिक लोकांचे अनुभव आणि पारंपरिक ज्ञान विचारात घेणे आवश्यक आहे.

- **शाश्वत विकासात आदिवसी समाजा समोरील प्रमुख अडचणी :-**

आदिवासी समाजाच्या शाश्वत विकासाच्या मार्गात काही महत्त्वाच्या अडचणी आहेत. दुर्गम वस्ती, शिक्षण आणि आरोग्य सुविधांची कमतरता, रोजगाराच्या मर्यादित संधी, योजनांची अपुरी माहिती आणि प्रशासनापर्यंत पोहोचण्यातील अडचणी यांचा त्यामध्ये समावेश होतो. याशिवाय काही वेळा विकासाच्या योजना स्थानिक गरजा लक्षात न घेता तयार केल्या जातात. त्यामुळे योजना उपलब्ध असूनही त्यांचा अपेक्षित परिणाम दिसून येत नाही. राजकीय सहभागाच्या बाबतीतही केवळ मतदानचा आकडा वाढणे पुरेसे नाही. नागरिकांना निर्णयप्रक्रियेत आपले मत मांडता आले पाहिजे आणि त्यांच्या मताचा विकासाच्या निर्णयांवर परिणाम झाला पाहिजे.

- **पुढील दिशा :-**

आदिवासी समाजाच्या शाश्वत विकासाच्या मार्गात काही महत्त्वाच्या अडचणी आहेत. दुर्गम वस्ती, शिक्षण आणि आरोग्य सुविधांची कमतरता, रोजगाराच्या मर्यादित संधी, योजनांची अपुरी माहिती आणि प्रशासनापर्यंत पोहोचण्यातील अडचणी यांचा त्यामध्ये समावेश होतो. याशिवाय काही वेळा विकासाच्या योजना स्थानिक गरजा लक्षात न घेता तयार केल्या जातात. त्यामुळे योजना उपलब्ध असूनही त्यांचा अपेक्षित परिणाम दिसून येत नाही. राजकीय सहभागाच्या बाबतीतही केवळ मतदान वाढणे पुरेसे नाही. नागरिकांना निर्णयप्रक्रियेत आपले मत मांडता आले पाहिजे आणि त्यांच्या मताचा विकासाच्या निर्णयांवर परिणाम झाला पाहिजे.

- **निष्कर्ष :-**

शाश्वत विकास उद्दिष्टे, राजकीय संस्था आणि आदिवासी समाज यांचा विचार एकत्रितपणे केला तर विकासाची संकल्पना अधिक स्पष्ट होते. शाश्वत विकास म्हणजे केवळ आर्थिक प्रगती नव्हे, तर समाजातील सर्व घटकांना समान संधी देऊन त्यांचे जीवनमान सुधारणे आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करणे होय. या प्रक्रियेत राजकीय संस्था महत्त्वाची भूमिका बजावतात. संसद आणि विधानमंडळे कायदे व धोरणे तयार करतात, सरकार आणि प्रशासन त्यांची अंमलबजावणी करतात, न्यायपालिका नागरिकांच्या अधिकारांचे संरक्षण करते आणि स्थानिक स्वराज्य संस्था विकासाला स्थानिक पातळीवर दिशा देतात. आदिवासी समाजाच्या बाबतीत मात्र एक गोष्ट विशेष महत्त्वाची आहे. त्यांच्यासाठी विकास करण्याबरोबरच त्यांना विकासाच्या निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेणे आवश्यक आहे. आदिवासी समाजाचा राजकीय सहभाग वाढला, स्थानिक स्वराज्य संस्था सक्षम झाल्या, ग्रामसभेला प्रभावी स्थान मिळाले आणि शिक्षण व राजकीय जागरूकता वाढली तर शाश्वत विकासाची प्रक्रिया अधिक परिणामकारक होऊ शकते.म्हणूनच **"शाश्वत विकास उद्दिष्टे, राजकीय संस्था आणि आदिवासी समाज"** या तिन्ही घटकांकडे एकत्रितपणे पाहणे आवश्यक

आहे. सक्षम संस्था, लोकांचा सक्रिय सहभाग, सामाजिक न्याय आणि पर्यावरणाचे संरक्षण या चार आधारांवर आदिवासी समाजाचा शाश्वत विकास अधिक प्रभावीपणे साध्य होऊ शकतो.

- संदर्भ

1. United Nations. (1987). *Our Common Future*. World Commission on Environment and Development.
2. United Nations. (2015). *Transforming our World: The 2030 Agenda for Sustainable Development*. United Nations.
3. Sachs, J. D. (2015). *The Age of Sustainable Development*. Columbia University Press.
4. Sen, A. (1999). *Development as Freedom*. Oxford University Press.
5. NITI Aayog. *SDG India Index*. Government of India.
6. Ministry of Statistics and Programme Implementation. *National Indicator Framework for Sustainable Development Goals*. Government of India.
7. Laxmikanth, M. *Indian Polity*. McGraw Hill Education.